# <u>कृष्णकृत्य रचणाऱ्यांचे पितळ उघड</u>

अरुण जेटली
विरोधी पक्षनेते, राज्यसभा

खरे आणि खोट्या मध्ये मूलतः खूप अंतर असते. खरे बदलले जात नाही. खोटे विरोधाभासाने भरलेले असते. खोटे बाहेर पडते. २००२ च्या गुजरात दंग्यांच्या संदर्भात नरेंद्र मोदी यांच्या विरोधकानी जी कट-कारस्थाने रचली त्यांचे पण असेच झाले.

गुजरात चे दंगे भारताच्या इतिहासातील एक वेदनादायक अध्याय होता. साबरमती एक्स्प्रेसला आग लावणे आणि त्यानंतर झालेल्या दंग्यात अनेक मोलाचे प्राण गेले आणि मोठ्या प्रमाणात संपत्तीचे नुकसान झाले.

खेद्जन्य बाब अशी आहे की, श्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्ववाली सरकारच्या विरोधात आरोप करण्यात आले की, दंगल घडविण्यामागे मोदी सरकार आहे. मात्र खरे वेगळेच आहे. सामान्यतः आणि दंडात्मक कारवाई करण्यासाठी एकूण १.००.४८८ लोकांना अटक करण्यात आली. भारतात कोणत्याही जाती अंतर्गत किंवा धार्मिक तणावामुळे अटक करण्यात आलेल्या लोकांच्या तुलनेत हि संख्या खूप अधिक होती. कोणत्याही इतर दंगलीत पोलीस गोळीबारात यापेक्षा अधिक लोक मारले गेले आहेत. त्यामुळे पोलिसांशी मिलीभगत असल्याचा आरोप फेटाळला जातो. ४२७२ प्रकरणे दाखल करण्यात आली. यापैकी ११६८ प्रकरणात निर्णय सुनावला गेला आणि हजारो आरोपींना दोषी ठरवले गेले. त्यापैकी अधिकतर कारवाई गुजरात पोलिसांनी केली.

पहिल्यांदा २००६ मध्ये म्हणजेच दंग्यांच्या ४ वर्षानंतर आरोप करण्यात आला की गुजरात पोलीस आरोपींबाबत कारस्थाने रचत आहे. चार मोठी प्रकरणे विशेष चौकशी विभागाकडे(एसआयटी) सोपविण्यात आली ज्याची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाने केली. या टीम चे नेतृत्व सीबीआय चे माजी निदेशक डॉ. आर.के. राघवन यांनी केले आणि यात ज्या पोलीस अधिका-यांना शामिल केले जे गुजरात काडर चे नव्हते. एसआयटीने प्रकरणांची चौकशी केली. आणखी काही आरोपींना अटक केली आणि गुजरात पोलिसांतर्फे नोंदविण्यात आलेल्या आरोप पत्रात साधारणतः संशोधन केले. सर्वोच्च न्यायालयाने एसआयटीकडून नोंदविण्यात आलेल्या आरोप पत्रांचा स्वीकार केला आणि त्यांच्या निष्पक्षतेबद्दल त्यांची प्रशंसा केली. एसआयटीच्या कोणत्याही रिपोर्ट मध्ये श्री नरेंद्र मोदी किंवा त्यांची सरकार शामिल असल्याचे कोणतेही प्रमाण नव्हते. ८/६/२००६ मध्ये श्री जकीया जाफरी यांनी एक नवीन तक्रार नोंदवली. त्यात त्यांनी आरोप केला की, मुख्यमंत्री आणि ६३ अन्य संविधानिक ब्रेकडाउन चा कट केला त्यामुळे राज्यात दंगलींचे कारस्थान केले गेले. यातील कोणताही आरोप नानावटी आयोगाला दिल्या गेलेल्या जबानीत शामिल नव्हता. त्यांच्या तक्रारीत ज्या पण गोष्टी होत्या तथ्य पाहिल्यास त्यापैकी खूप गोष्टी खोट्या होत्या. त्यांच्या तक्रारीचा सार असा होता की २७/२/२००२ ला गांधीनगर मध्ये मुख्यमंत्री यांच्या घरी झालेल्या बैठकीत स्वर्गीय श्री हरेन पंड्या आणि तत्कालीन पोलीस अधीक्षक श्री संजीव भट्ट उपस्थित होते ज्यामध्ये मुख्यमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना संकेत दिले की हिंदू समुदायाला त्याचा राग काढण्यास परवानगी द्यावी. असे कळल्यानंतर की स्वर्गीय हरेन पंड्या यांचे फोन रेकॉर्ड त्यांच्या गांधी नगर येथे नाही तर अहमदाबाद येथे उपस्थित होण्याचे संकेत देत आहेत तेव्हा त्यांनी या आरोपांना आणखी पुढे वाढविले नाही. बैठकीत उपस्थीत सर्व ८ वरिष्ठ अधिकाऱ्यांशी एसआयटीने चोकशी केली. त्यांना स्पष्टपणे माहित होते की संजीव भट्ट बैठकीत उपस्थित नव्हते आणि मुख्यमंत्र्यांनी अशाप्रकारचे वक्तव्य केले नव्हते. रेकॉर्ड सांगतात की संजीव भट्ट त्यावेळी अहमदाबाद येथे होते आणि काही वर्षानंतर पुरावे जमविण्यासाठी काही लोकांसोबत कारस्थान केले. सर्वोच्च न्यायालयाने २७/११/२००७ रोजी एसआयटीला निर्देश दिले की त्यांनी या प्रकरणी पण लक्ष घालावे. एसआयटीने सर्व ६३ कथित कटकारस्थान करणा-यांशी विचारपूस केली.त्यांनी मुख्यमंत्र्यांशी नऊ पेक्षा अधिक तास विचारपूस केली. सर्व प्रमुख साक्षीदारांची चौकशी केली आणि २४/४/११ ला दिलेल्या

अहवालात असे सांगितले गेले की फक्त तक्रारीवरून श्री नरेंद्र मोदी यांच्याविरोधात प्रकरण होऊ शकत नाही. एसआयटी च्या अहवालाने असंतुष्ट असलेल्यांनी एक एमिकास करी नियुक्त करण्यासाठी दबाव वाढविला जीने २५/४/२०११ रोजी आपले मत दिले. १२/४/२०११ ला एसआयटी ला सांगण्यात आले की तीने सीआरपीसी ची धारा १७३ च्या अंतर्गत माजीस्ट्रेट ला आपला अहवाल द्यावा. एमिकास करी चा अहवाल घेण्यासाठी कोणती रोक-टोक नव्हती. तेव्हा माजीस्ट्रेट यांनी सर्व पुरावे तपासले. तक्रारदारांच्या याचिकांचा विरोध केला. युक्तिवाद विस्तार पूर्वक ऐकला आणि श्री नरेंद मोदी प्रकरण बंद करण्यास स्वीकृती दिली. सत्याचा विजय झाला. एका अपराधात मुख्यमंत्र्यांना फसविण्याच्या कटाचा पर्दाफाश झाला. वार दिल्या गेलेल्या तथ्यातून काही असे निष्कर्ष निघतात ज्यांना नाकारून चालणार नाही. काँग्रेस पक्ष आणि तिचे प्रायोजक एनजीओ श्री नरेंद्र मोदी यांचा राजकीय दृष्ट्या मुकाबला करू शकत नाहीत. त्यांनी एसआयटी, सीबीआय न्यायालयात पडलेल्या याचिकांचा वापर करण्याचा प्रयत्न केला आणि त्यांना बदनाम करण्यासाठी अभियान चालविले. त्यापैकी कुठूनही त्यांना यश मिळाले नाही. अधिकाऱ्यांच्या एका छोट्या समूहाने काँग्रेस आणि एनजीओ साठी ही राजकीय रणनीती बनविली. त्यांनी पुराव्यांना मीठ-मसाला लाउन सदर केले. काही वेबसाईटसनी सत्य समोर येऊ नये म्हणून स्टिंग ऑपरेशन केले.

राजकीय दृष्ट्या श्री नरेंद्र मोदी आणखी मजबूत झाले. त्यांनी अनधिकृत लोक, मिडिया त द्वेष व्यक्त करणाऱ्या गटाशी आणि वाईट भावना असलेल्या एनजीओ चा सामना केला. ते आपल्या रस्त्याशी भटकले नाहीत. त्यांनी गुजरात च्या विकासासाठी काम करण्यासाठी लक्ष केंद्रित केले आणि लोकांशी थेट संपर्क साधण्यास यशस्वी झाले. त्यामुळे त्यांना २००२, २००७ आणि २०१२ च्या गुजरात विधानसभा निवडणुकीत यश मिळाले. मेट्रोपोलीटन कोर्टाने श्री नरेंद्र मोदी यांना क्लीन चीट दिली आणि त्या लोकांना दोषी ठरवले जे त्यांच्या विरोधात पुरावे गोळा करत होते. त्यांनी विचलित झाल्याशिवाय २०१४ चे निवडणूक अभियान जारी ठेवले आहे.